# कळंबे तर्फ कळे येथील आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ,
# पद्मश्री डॉ ग. गो. जाधव महाविद्यालय
# विविध समाजिक उपक्रम अहवाल

करोना कालावधीमध्ये समाजामध्ये वेगवेगळया पातळीवर मदत कार्य करणाऱ्या आणि सेवा बजावणाऱ्या डॉक्टर, आरोग्य सेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्ते या कोवीड योद्ध्यांचा प्रमाणपत्र शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला तसेच कार्यक्रमांमध्ये जिल्हा परिषद कोल्हापूरच्या अर्थ व शिक्षण सभापती रसिका पाटील यांनी आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ या मार्फत केल्या जाणाऱ्या सामाजिक कार्याचा गौरव केला या कार्यक्रमाकरिता त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तसेच पंचायत समिती सदस्य अविनाश पाटील यांनी संस्था अध्यक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या उपक्रमांचा इतर संस्थांनी आदर्श घ्यावा असे मत व्यक्त केले

यावेळेस कळंबे तर्फ कळे या गावातील पन्नास पूरग्रस्तांना पद्मश्री डॉ ग. गो. जाधव महाविद्यालय गगनबावडा यांच्यावतीने चादर तर आनंदी फार्मसी कॉलेजच्या वतीने मास्क, सॅनिटायझर, मल्टीविटामिन सिरप टेबलेट्स आदी बाबी असणारे मेडिकल किटचे वाटप करण्यात आले.






**कोल्हापूर : वाढदिवसानिमित्त प्राध्यापक सतीश देसाई यांचा गौरव करताना प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा.**

## सतीश देसाई यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा)** : आनंदी शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा. सतीश देसाई यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. जि. प. अर्थ व शिक्षण सभापती रसिका पाटील, पं. स. सदस्य अविनाश पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी कोरोना योद्ध्यांचा सन्मान करण्यात आला. कळंबे तर्फ कळे येथील ५० पूरग्रस्तांना पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाच्या वतीने चादर तर आनंदी फार्मसी कॉलेजच्या वतीने मेडिकल किटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा, प्रा. पी. एस. कुंभार आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. एस. एस. पानारी यांनी तर सूत्रसंचालन प्रा. ए. एस. कांबळे यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. आर. एस. आडनाईक यांनी मानले.